Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July 2024 5(7SE), 225–228

# INDIA'S ROLE IN THE CHANGING CURRENTS OF WORLD POLITICS

# जागतिक राजकारणातील बदलत्या प्रवाहात भारताची भूमिका

Dr. Rekha Ramnath Bane [1]

[1] Late Mrs. Sheshabai Sitaram Mundhe College, T. Gangakhed Dist. Parbhani, India

https://crossmark.crossref.org/dialog/?doi=10.29121/shodhkosh.v5.i7se.2024.5880&domain=pdf&date_stamp=2024-07-31

**DOI**
**10.29121/shodhkosh.v5.i7SE.2024.5880**

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

OPEN ACCESS

## ABSTRACT

**English:** India's rapidly growing economy, strategic importance of geographical location and democratic governance have made India an important nation-building country in world politics. India's growing role on the world stage, its strategic partnerships, economic influence and political initiatives are seen as important. India's role in world politics has evolved significantly. From the post-colonial period and the non-alignment movement to becoming an influential global power, India has come a long way. Due to its growing economic power, strategic geographical location and active participation in world politics, India is playing a significant role in shaping world politics. This article provides an in-depth analysis of changes in India's foreign policy, economic influence, defense policies and diplomatic relations.

**Hindi:** भारतदेशाची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, भौगोलिक स्थानाचे धोरणात्मक महत्त्व आणि लोकशाही शासन यामुळे जागतिक राजकारणात भारत एक महत्त्वाचा राष्ट्रनिर्माण झाला आहे. जागतिक मंचावर भारताची वाढती भूमिका, त्याच्या धोरणात्मक भागीदारी, आर्थिक प्रभाव आणि राजनैतिक पुढाकार महत्वाचा दिसून येतो. जागतिक राजकारणातील भारताची भूमिका लक्षणीयरीत्या विकसित झाली आहे. वसाहतोत्तर कालखंड आणि अलिप्तवादीचळवळीपासून ते एक प्रभावशाली जागतिक शक्ती होण्यापर्यंत भारताने मोठी वाटचाल केली आहे. वाढती आर्थिक शक्ती, धोरणात्मक भौगोलिक स्थान आणि जागतिक राजकारणातील सक्रिय सहभाग यामुळे भारत जागतिक राजकारण घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या लेखात भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल, आर्थिक प्रभाव, संरक्षण धोरणे आणि राजनैतिक संबंध यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.।

## 1. प्रस्तावना

भारतदेशाची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, भौगोलिक स्थानाचे धोरणात्मक महत्त्व आणि लोकशाही शासन यामुळे जागतिक राजकारणात भारत एक महत्त्वाचा राष्ट्रनिर्माण झाला आहे. जागतिक मंचावर भारताची वाढती भूमिका, त्याच्या धोरणात्मक भागीदारी, आर्थिक प्रभाव आणि राजनैतिक पुढाकार महत्वाचा दिसून येतो. जागतिक राजकारणातील भारताची भूमिका लक्षणीयरीत्या विकसित झाली आहे. वसाहतोत्तर कालखंड आणि अलिप्तवादीचळवळीपासून ते एक प्रभावशाली जागतिक शक्ती होण्यापर्यंत भारताने मोठी वाटचाल केली आहे. वाढती आर्थिक शक्ती, धोरणात्मक भौगोलिक स्थान आणि जागतिक राजकारणातील सक्रिय सहभाग यामुळे भारत जागतिक राजकारण घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या लेखात भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल, आर्थिक प्रभाव, संरक्षण धोरणे आणि राजनैतिक संबंध यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.

21व्या शतकात जागतिक सत्ता-संतुलन मोठ्या प्रमाणात बदलत आहे. पारंपरिक पाश्चिमात्य राष्ट्रांच्या वर्चस्वाला नव्याने उदयास येणाऱ्या अर्थव्यवस्थांनी आणि प्रादेशिक शक्तींनी आव्हान दिले आहे. वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, विस्तृत होत असलेले राजनैतिक संबंध आणि सामरिक लष्करी प्रगतीमुळे भारत जागतिक व्यवहारात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या लेखात भारताच्या परराष्ट्र धोरणातील बदल, आर्थिक प्रभाव आणि सामरिक सहकार्याचा आढावा आणि प्रमुख जागतिक शक्ती म्हणून स्थापित करण्यासाठी असलेल्या आव्हाने आणि संधींचे विश्लेषण करतो.

## 2. भारतीय परराष्ट्र धोरणातील बदल

भारताचे परराष्ट्र धोरण स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात बदलले आहे. सुरुवातीला भारताने अलिप्तवादी चळवळीचे (NAM) धोरण स्वीकारले, ज्यामध्ये अमेरिका आणि सोव्हिएत संघाच्या कोणत्याही गटात सहभागी न होता स्वतंत्र धोरण ठेवले गेले. मात्र, शीतयुद्ध समाप्तीनंतर आणि १९९१ मधील आर्थिक उदारीकरणानंतर भारताचे परराष्ट्र धोरण बदलले आणि धोरणात्मक भागीदारी, आर्थिक राजनैतिक संबंध आणि प्रादेशिक नेतृत्वावर भर देण्यात आला.आत्मनिर्भर भारत (Self-Reliance in Défense) नुसारस्वदेशी संरक्षण उत्पादनाला चालना देणारे धोरण, जे परकीय शस्त्रास्त्रांवरील अवलंबन कमी करत आहे.आणि स्वबळावर अस्तित्त्व निर्माण करण्यावर भर आहे.

## 3. समकालीन भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये

1) सामरिक स्वायत्तता (**Strategic Autonomy**) – भारत कोणत्याही एका राष्ट्रावर अवलंबून न राहता जगतील पातळीवर स्वतंत्र धोरण राबवतो.भारताचे परराष्ट्र धोरण स्वातंत्र्य, सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय हितसंरक्षणावर आधारित आहे. भारत कोणत्याही एका राष्ट्राच्या किंवा गटाच्या अधीन न राहता स्वतंत्र आणि स्वायत्त परराष्ट्र धोरण आखतो.
2) पूर्वेकडील देश (**Act East Policy**) – या धोरणाच्या माध्यमातून भारत दक्षिण-पूर्व आशियाई देशांशी व्यापार आणि कूटनीतिक संबंध वाढवत आहे.आग्नेय तसेच या पूर्वी देशांशी आर्थिक आणि विवध पातळीवर सहकार्य वाढवून चीनच्या प्रभावाला तोलण्याचा प्रयत्न केला जातो.
3) शेजार प्रथम (**Neighbourhood First Policy**) – भारत आपल्या शेजारील देशांशी शांतता आणि परस्पर सहकार्याचे संबंध ठेवण्यास प्राधान्य देतो. दक्षिण आशियाई शेजारी देशांशी स्थैर्य व आर्थिक सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. यात प्रादेशीक पातळीवरील संघटना मार्फतजसे SAARC (दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना)अंतर्गत भारत आपल्या शेजारी देशांशी आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करतो.त्यांना वेळप्रसंगी विवध मदतकार्य सुद्धा करतो.
4) बहुपक्षीय सहभाग (**Multilateral Engagement**) – भारत जागतिक पातळीवर विवध संघटना मध्ये वेगवेगळ्या पातळीवर UN, G20, BRICS आणि Quad सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांमध्येसक्रियसहभाग नोंदवत असतो. यामुळे जागतिक राजकारणात भारताचा सहभाग वाढत आहे.

## 4. जागतिक राजकारणावर भारताचा आर्थिक प्रभावमुख्य आर्थिक योगदान

भारताच्या वेगवान आर्थिक विकासामुळे तो जागतिक व्यापार व अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक बनला आहे. भारताची GDP ही जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये मोजली जाते आणि त्याचा प्रभाव माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती आणि नवीकरणीय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये वाढला आहे.यामुळे विवधउत्पादन क्षेत्रात“मेक इन इंडिया अंतर्गत”आणि विविध मुक्त व्यापार करारांमुळे जागतिक पुरवठा साखळीत भारताची भूमिका महत्त्वाची बनली आहे. तसेच नवीकरणीय ऊर्जेत मोठ्या प्रमाणावर भारत गुंतवणूक करत आहे आणि हरित तंत्रज्ञानाच्या आधारावर शाश्वतत विकासाठी भारताचा भर आहे.

## 5. सांस्कृतिक आणि सौम्य सामर्थ्य धोरण (**SOFT POWER DIPLOMACY**)

भारत योग, आयुर्वेद, भारतीय संस्कृती, बॉलिवूड आणि पर्यटनाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर  सौम्य सामर्थ्य वाढवत आहे.जागतिक योग दिवसाची संकल्पना भारताने मांडली आणि ती संयुक्त राष्ट्रसंघ(UN)ने जागतिक स्तरावर स्वीकारली यामुळे जागतिक स्तरावर भारताची एक वेगळी ओळख निर्माण झाली.भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाचा जागतिक स्तरावर प्रभाव दिसून येतो.हे भारताचे काही सौम्य बलस्थान आहेत.

## 6. सामरिक भागीदारी आणि संरक्षण क्षमता

भारताच्या भौगोलिक स्थितीमुळे त्याला मजबूत संरक्षण धोरण आवश्यक आहे. चीन आणि पाकिस्तानच्या सीमावादामुळे भारताने स्वसंरक्षणावर विशेष भर दिला आहे.भारताने जगातील विकसित देशातील म्हणजेचक्वाड या जागतिक युती सोबत (Quad Alliance) अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासोबत भारताने युती स्थापन केलेली ही गटबांधणी इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या प्रभावाला तोलण्याचा प्रयत्न करते.

## 7. जागतिक स्तरावर भारताची राजनैतिक भूमिका

भारताने जागतिक प्रशासनात सक्रिय भूमिका बजावली आहे आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेच्या (multipolar world order) समर्थनासोबतच आर्थिक समता आणि हवामान कृतीसाठीही पूढील विवध संघटना माध्यमतून प्रमुख राजनैतिक सहभाग घेतला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघ (UN) – भारत संयुक्त राष्ट्रसंघात स्थायी सुरक्षा परिषद सदस्यत्वासाठी आग्रह धरत आहे. जर हे सदस्तव्य मिळाले तर भारताचा आशिया खंडात आणि जागतिक राजकारणात भारताचा दबदबा वाढणार आहे.

G20 नेतृत्व – भारत विकसनशील देशांमध्ये आर्थिक सहकार्याला चालना देण्याचे कार्य नेहमीच करत आला आहे. नुकतेच भारताने जी 20 या परिषदेचे अध्यक्षपद भूषविले होते. यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील विवध देशाचे प्रमुख नेते, अर्थतज्ञ विवध जागतिक संघटणाचे प्रतिनिधि उपस्थतीत होते. यामध्ये भारताने डिजिटल पब्लिक इनफ्रास्ट्रक्चर (DPI) आणि शाश्वत विकास (SDGs) साध्य करण्यासाठी सहकार्य करण्याचे आव्हान केले.

हवामान बदल नेतृत्व – पॅरिस करार आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या (International Solar Alliance) माध्यमातून हरित तंत्रज्ञानात भारताचा पुढाकार आहे.

## 8. आव्हाने

जरी भारताची जागतिक भूमिका सतत वाढत असली तरीही काही आव्हाने त्याच्या जागतिक राजकारणातील भूमिकेवर परिणाम करू शकतात ती पूढीलप्रमाने आहेत.

1) भू-राजकीय तणाव (**Geopolitical Tensions**)

भारताचे चीन आणि पाकिस्तानसोबतचे संबंध ऐतिहासिकदृष्ट्या तणावग्रस्त राहिले आहेत. सीमा विवाद, लष्करी संघर्ष, राजकीय आणि आर्थिक स्पर्धा यामुळे या तणावाला सतत चालना मिळते.भारतचीन आणि पाकिस्तानसोबतच्या भू-राजकीय तणावाला सामोरे जाण्यासाठी सैन्यबळ, आंतरराष्ट्रीय संबंध, आर्थिक विकास आणि तंत्रज्ञानया सर्व क्षेत्रांमध्ये भक्कम पावले उचलत आहे.सामरिक सहकार्य, संरक्षण सुसज्जता आणि कणखर परराष्ट्र धोरणयामुळे भारत भविष्यात या तणावावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करेल.

2) जागतिक शक्तींशी संतुलन राखणे

भारत एकबहु-ध्रुवीय (Multi-Polar)धोरणअवलंबून जागतिक शक्तींशी संतुलन राखण्याचा प्रयत्न करतो. पश्चिमी राष्ट्रांबरोबरच्या वाढत्या संबंधांमुळे आणि पारंपरिक मित्रदेशांसोबत (जसे की रशिया) असलेल्या ऐतिहासिक संबंधांमुळे भारतासमोर मजबूत संबंध ठेवणे एक मोठे आव्हान आहे.यासाठीधोरणात्मक स्वायत्तता ("Strategic Autonomy")हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिले आहे.

## 9. भविष्यातील संधी

1) भारताचा वेगवान आर्थिक विकास

आगामी काळात आर्थिक सहकार्य आणि तंत्रज्ञानातील प्रगती भारताच्या जागतिक प्रभावाला बळकटी देईल. मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यामुळे देशी उत्पादन आणि निर्यात वाढत आहे.आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF)आणि वर्ल्ड बँकेच्या अंदाजानुसार, भारत 2030 पर्यंत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल असा अंदाज आहे. यामुळे येणाऱ्या काळात भारत चांगली आर्थिक प्रगती नक्की करेल.

2) तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे भारताचा वाढता प्रभाव

अंतराळ तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रातइस्रोने 'चांद्रयान-३' आणि 'आदित्य L1' यशस्वी करून जागतिक स्तरावर भारताचा दबदबा निर्माण केला. तसेच गगनयान' मोहिमेद्वारे भारत 2025 पर्यंत माणूस अंतराळात पाठवणार आहे. त्याबरोबर

3) डिजिटल इंडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

भारताने डिजिटल क्रांतीच्या माध्यमतून विविध क्षेत्रांमध्ये भारताने मोठी प्रगती केली आहे.यात UPI प्रणालीने डिजिटल पेमेंट्समध्ये क्रांती घडवली असून, UPI (Unified Payments Interface) प्रणालीने भारताला डिजिटल पेमेंट्समध्ये जागतिक स्तरावर नाव लौकिक  बनवले. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता AI आणि Quantum Computingमध्ये भारत वेगाने प्रगती करत आहे. ड्रोन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा संरक्षण क्षेत्रात मोठा वापर होत आहे.

4) भारताची जागतिक नेतृत्व भूमिका

जी 20 अध्यक्षपदामुळे भारताची जागतिक पातळीवरील कूटनीती मजबूत झाली असून 'Global South' मध्ये भारताला विकसित देशांशी जोडणारा महत्त्वाचा नेता मानले जाते. त्याबरोबर BRICS आणि QUAD या दोन्ही संघटनांमध्ये भारताची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.या जागतिक पातळीवरील भारताच्या सहभागमुळे भारताची वाटचाल जगतील पातळीवर विकसित देशाकडे होते आहे.

## 10.निष्कर्ष

भारताची जागतिक राजकारणातील वाढती भूमिका त्याच्या धोरणात्मक राजनैतिक दृष्टिकोन, आर्थिक स्थैर्य आणि लष्करी विकासावर अवलंबून आहे. कारण तो बहुध्रुवीय जगाच्या गुंतागुंतीचा सामना करत आहे.भारताची आंतरराष्ट्रीय घडामोडींवर प्रभाव टाकण्याची क्षमता वाढत आहे. त्याच्या आर्थिक सामर्थ्य, धोरणात्मक पुढाकार, आणि राजनैतिक संलग्नतेमुळे, भारत जागतिक राजकारणाचे भविष्य घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सज्ज आहे. आर्थिक सामर्थ्य, राजनैतिक जाळे आणि सामरिक भागीदारीचा योग्य वापर केल्यास, भारत जागतिक व्यवस्थेत निर्णायक भूमिका बजावू शकेल.मात्र, या संधींचा लाभ घेण्यासाठी देशांतर्गत आव्हानांना सामोरे जाणे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधींचा लाभ घेणे आवश्यक आहे.आर्थिक वाढ, तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्य यामुळे भारताची जागतिक शक्ती म्हणून ओळख वाढत आहे.म्हणुन "सामर्थ्यशाली अर्थव्यवस्था + नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान = भारताचा जागतिक प्रभाव"हे सूत्र भारताच्या यशाचे गमक ठरणार आहे।

## संदर्भ

डॉ.शैलेंद्र देवळाणकर,भारत आणि जग, सकाळ प्रकाशन
शर्मा, राजीव. "इंडियाज फॉरेन पॉलिसी: अ न्यू व्हिजन." जर्नल ऑफ इंटरनॅशनल रिलेशन्स, 2022.
सिंह, श्याम शरण. "इंडियाज फॉरेन पॉलिसी: चॅलेंजेस अँड ऑपर्च्युनिटीज." ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, 2022.
विजय नाईक,"भारत-चीन संबंध", विवेक प्रकाशन
डॉ.शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्र धोरण, सकाळ प्रकाशन
डॉ. बी जी तोडकर, आंतरराष्ट्रीय संबंध, डायमंड पब्लिकेशन
'बदलता भारत : पारतंत्र्यातून महासत्तेकडे'
'The New India: The Unmaking of the World's Largest Democracy'